**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २६५** **दिनांक :- २४/०९/२०२१**

## चैन स्नॅचिंग आणि मोटारसायकल चोरी करणारे आरोपी अटक करून एकुण ०४ गुन्हे ऊघडकीस व १,९०,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत.

रस्त्यावरुन पायी चालणाऱ्या महिलांच्या गळयामधील सोन्याची चैन जबरीने चोरी करणे तसेच मोटारसायकल चोरी अशा स्वरुपाच्या दाखल गुन्हयाचा तपास करतांना विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण कक्षाने घटनास्थळावरील प्राप्त पुरावे, आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन २ आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये आरोपीतांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने आरोपी नामे १) रॉबिन स्टिवन सोन्स, वय २७ वर्षे, रा. भाटपाडा, विरार (पु) (जबरीने सोनसाखळी चोरी) व २) मोहम्मद इरफान सलीम शेख, वय-२४ वर्षे, रा. साईदत्त झोपडपट्टी, डोंगरी, विरार पुर्व (मोटारसायकल चोरी) यांना अटक केली असून आरोपीतांकडून १,५०,०००/- रुपये किंमतीच्या एकुण तीन मोटारसायकल आणि ४०,०००/- रुपये किंमतीची १० ग्रॅम वजनाची एक सोन्याची चैन असा एकुण १,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरील आरोपीतांकडे विचारपूस केली असता खालीलप्रमाणे ४ गुन्हे उघडकीस करण्यास यश आले आहे.

१. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७७४/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३७९ (मोटारसायकल चोरी)
२. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३७५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३७९ (मोटारसायकल चोरी)
३. बोरीवली पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १९१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३७९ (मोटारसायकल चोरी)
४. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७६२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ (जबरी चोरी)

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, श्री. प्रफुल्ल वाघ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, सागर घुगरकर, रवी वानखेडे, सुनिल पाटील आणि पवन पवार यांनी केली आहे.

*********